ePaper

**सौदी अरेबियाने पाकला दाखवली लायकी, 50 हजार भिकाऱ्यांना मायदेशी हाकलले**



| वर्ष - 9 | अंक -115 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 19 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- इशान किशनचे 45 चेंडूत शतक!
- पाचव्या T20I सामन्यावर 'रद्द' चे सावट?
- बिहारमध्ये 'हाय अलर्ट'!
- लोकसभा आहे की कुस्तीचा आखाडा?

## बनावट कागदपत्रे प्रकरण : वर्षभरात राष्ट्रवादीच्या दुसऱ्या मंत्र्याला डच्चू

# कोकाटे यांचा राजीनामा!

## शासकीय सदनिकेसाठी बनावट कागदपत्रे सादर केल्याप्रकरणी दोषी ठरल्यानंतर दबाव वाढला

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**शासकीय सदनिकेसाठी बनावट कागदपत्रे सादर केल्याप्रकरणी माणिकराव कोकाटे यांना कनिष्ठ तसेच नाशिक सत्र न्यायालयाने दोषी ठरवित दोन वर्षांची शिक्षा ठोठावल्याने अखेर गुरुवारी त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. सत्तेत असलेल्या महायुती सरकारवर संरक्षणाच्या आरोपांची सरबत्ती होत असताना मंत्रीपद टिकवून ठेवण्याचा कुठलाही धोका पत्करू नये, असा निर्णय अखेर नेतृत्वाने घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. गेल्या वर्षभरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटातील दोन मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागल्याने महायुती सरकारची प्रतिमा पुन्हा एकदा धूसर झाली आहे.**



न्यायालयाने दिलेल्या शिक्षेनंतर कोकाटे यांच्या अटकेसाठी वॉरंट जारी करण्यात आले. महापालिका निवडणुकांच्या तोंडावर एका मंत्र्याला पाठीशी घातल्यास मतदारांत नकारात्मक संदेश जाण्याची भीती व्यक्त होत होती. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात ठाम भूमिका घेत कोकाटे यांना बिनखात्याचे मंत्री म्हणूनही पुढे ठेवणे शक्य नसल्याचे मत व्यक्त केले. बुधवारी रात्री उशिरापर्यंत फडणवीस, अजित पवार आणि सुनील तटकरे यांच्यात चर्चा झाली. अखेर गुरुवारी सकाळी कोकाटे यांचा राजीनामा स्वीकारण्याबाबत सहमती झाली.

कोकाटे यांनी सत्र न्यायालयाच्या निकालाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून त्यावर आज (शुक्रवारी) सुनावणी अपेक्षित आहे. राष्ट्रवादीकडून तरी सुनावणीपर्यंत कोकाटे यांना मंत्रिपद टिकवून ठेवण्याचा प्रयत्न झाला असे समजते. परंतु मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नकारामुळे अजित पवार यांचा नाइलाज झाल्याचे मानले जाते.

महायुती सरकारला दोन आठवड्यांपूर्वी एक वर्ष पूर्ण झाले. या काळात राष्ट्रवादीच्या धनंजय मुंडे व आता कोकाटे यांच्यासह दोन मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला आहे. पावसाळी अधिवेशनादरम्यान सभागृहात मोबाईलवर रमी खेळल्याच्या आरोपांनंतर कोकाटे यांच्याकडील कृषी खाते काढून घेण्यात आले होते. नंतर त्यांच्याकडे क्रीडा आणि अल्पसंख्याक खाती सोपविण्यात आली होती. या खात्यांवरही कार्यक्षमता आणि आचरणावरून टीका होत होती.

शिवसेना पक्षातील संजय शिरसाट, भरत गोगावले, संजय राठोड आणि योगेश कदम या मंत्र्यांवरही गंभीर आरोप झाले असून त्यावर सरकारकडून 'कारवाई'पेक्षा 'संबंध सुधारणा' धोरण सुरू असल्याची विरोधकांची टीका होती. शिरसाट यांचा मुलगा अडकलेल्या प्रकरणाची चौकशीचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. तर गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी लेडीज बारच्या परवान्यांविषयीचा निर्णय मागे घेतला.

मात्र कोकाटे प्रकरणात परिस्थिती वेगळी होती. बनावट कागदपत्रांचा वापर हा थेट फौजदारी गुन्हा मानला जात असल्याने संरक्षणाचा धोका अधिक असल्याचे वरिष्ठांनी पाहिले. हा निकाल महापालिका निवडणुकीच्या अगदी तोंडावर लागला असल्याने विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली होती. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी "हा मंत्री तातडीने पदावरून हटवला नाही तर सरकारही गुन्ह्यात समान वाटे आहे," असा आरोप केला होता.

महायुती सरकारची प्रतिमा आधीच तडजोडींच्या राजकारणामुळे धूसर झाली असताना कोकाटे प्रकरणाने पुन्हा चर्चांना उधाण आले आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर भाजपचे मतदार आणि संघटनांकडूनही दबाव वाढत असल्याने त्यांनी ठाम पवित्रा घेतल्याचे मानले जाते. कोकाटे यांना अभय देण्याच्या विरोधात भाजपकडून तीव्र विरोध व्यक्त झाला होता. मंत्रिमंडळ बैठकीत काही मंत्र्यांनीही शंका उपस्थित केल्या होत्या.

**कोणाला नव्याने संधी?**

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर ओबीसी समाजातील छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला होता. कोकाटे यांच्या राजीनाम्यानंतर मंत्रिमंडळात परतण्यास मुंडे हे प्रयत्नशील आहेत. पण अजित पवार हे कोकाटे यांच्या जागी मराठा समाजातील नेत्याला संधी देतात की मुंडे यांचे राजकीय पुनर्वसन करतात याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## आमदारकी वाचणार का?

न्यायालयाने दिलेली दोन वर्षांची शिक्षा कायम राहिल्यास लोकप्रतिनिधी कायद्यातील कलम ८ (३) अन्वये आमदारकी आपोआप रद्द होते. अशी स्थिती पूर्वी राहुल गांधी आणि सुनील`दार यांच्या बाबतीत झाली होती. दोषसिद्धीला स्थगिती मिळाल्याशिवाय सचिवालयाकडून सदस्यत्व कायम ठेवता येत नाही. त्यामुळे कोकाटे यांना स्थगिती मिळेल का आणि मिळाली नाही तर विधानसभेची जागा रिक्त होणार आणि निवडणुकीची प्रक्रिया सुरू होणार का, याबाबत राजकीय व कायदेशीर वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. विधानसभा अध्यक्षांकडे अपात्रतेची प्रक्रिया पाठवून जागा रिक्त करण्याचा मार्ग आहे. तोपर्यंत राजकीय दडपण, न्यायालयीन प्रक्रियेची गती यावर कोकाटेंचे भविष्य ठरणार आहे. महानगरपालिका निवडणुका जवळ आल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सत्ताधारी महायुतीला हे प्रकरण निवडणुकीत अडचण ठरू नये म्हणून राजीनामा घेण्याचा निर्णय घेतला गेल्याचे स्पष्ट दिसते. परंतु या प्रकरणात अजित पवार गटावर सततची नकारात्मक छबी चिकटू नये, यासाठीही नुकसान नियंत्रणाचा प्रयत्न होत असल्याने पुढील काही दिवसातील घडामोडी महत्त्वाच्या ठरणार आहेत. राजीनाम्यानंतरही राजकीय आणि कायदेशीर प्रश्न कायम आहेत. उच्च न्यायालयाची सुनावणी, विधानसभेतील अपात्रतेचा निर्णय आणि निवडणुकीतील परिणाम या तीन पातळ्यांवर पुढील लढत रंगणार आहे. महायुतीतील तणाव आणि विरोधकांचा दबाव यांचा सामना सरकार कितपत करते, हे येणारे दिवस ठरवतील.

## मोहोळांशी पंगा घेणं भोवलं — महायुतीतील अंतर्गत राजकारण चांगलेच तापले

# बैठकीतून रवींद्र धंगेकरांना डावलले

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे (MUNICIPAL ELECTION 2026) बिगुल वाजले असून 15 जानेवारी रोजी मतदान, तर 16 जानेवारीला मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. पुणे महापालिका निवडणुकीच्या (PUNE MUNICIPAL ELECTION) दृष्टीनेही घडामोडी महत्त्वाच्या ठरत असून महायुतीतील (MAHAYUTI) अंतर्गत राजकारण चांगलेच तापले आहे.**

## काय म्हणाले रवींद्र धंगेकर?





पुणे महापालिकेची निवडणूक भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) महायुती म्हणून लढवली जाणार आहे. या संदर्भात आज पुण्यात दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला भाजपकडून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार माधुरी मिसाळ आणि शहराध्यक्ष गणेश बिडकर उपस्थित राहणार आहेत. तर शिंदे गटाकडून उद्योगमंत्री उदय सामंत, उपनेत्या निलम गोऱ्हे, माजी आमदार विजय शिवतारे आणि संपर्कप्रमुख नाना भानगीरे सहभागी होणार आहेत.

मात्र या बैठकीतून शिंदे गटाचे पुणे महानगरप्रमुख आणि माजी आमदार रवींद्र धंगेकर यांना डावलण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. भाजप नेत्यांच्या विरोधामुळे शिंदेंच्या शिवसेनेकडून रवींद्र धंगेकरांना निर्णय प्रक्रियेतून डावलण्यात आले. विशेष म्हणजे धंगेकरांनी काही दिवसांपूर्वी शिवसेना (शिंदे गट) पुणे महापालिकेतील सर्व 165 जागा लढवण्याची तयारी करत असल्याचा दावा केला होता. त्यानंतर आता त्यांच्याच पक्षाच्या नेत्यांकडून आज भाजपला युतीत 35 ते 40 जागा मिळाव्यात यासाठी प्रस्ताव देण्यात येणार आहे. तर, पुणे जैन बोर्डिंग हाऊस प्रकरणात रवींद्र धंगेकर यांनी केंद्रीय मंत्री मुरलीधार मोहोळ यांच्यावर गंभीर आरोप केले होते. आता हेच प्रकरण रवींद्र धंगेकर यांना भोवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

दरम्यान, याबाबत रवींद्र धंगेकर यांच्याशी संवाद साधला असता बैठकीबाबत मला काहीही कळाले नाही. तुमच्या मार्फत याबाबत कळलंय. दिवसभरात निमंत्रण येईल. आज मी शिवसेनेच्या मुलाखती घेणार आहे ते संपवून काय आहे ते कळेल, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. दरम्यान,

## राजकीय वर्तुळात रंगली

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार माधुरी मिसाळ आणि शहराध्यक्ष गणेश बिडकर उपस्थित राहणार आहेत. तर शिंदे गटाकडून उद्योगमंत्री उदय सामंत, उपनेत्या निलम गोऱ्हे, माजी आमदार विजय शिवतारे आणि संपर्कप्रमुख नाना भानगीरे सहभागी होणार आहेत.मात्र या बैठकीतून शिंदे गटाचे पुणे महानगरप्रमुख आणि माजी आमदार रवींद्र धंगेकर यांना डावलण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

विधानसभेचे उपाध्यक्ष आणि अजित पवारांचे विश्वासू अण्णा बनसोडेंचा मुलगा सिध्दार्थ यंदा नशीब अजमावणार आहे. मात्र मुलाचा बाल हट्ट पुरवण्यासाठी बनसोडेंना एखाद्या जागेवर अतिक्रमण करावं लागणार आहे.

कारण पिंपरी चिंचवड शहरात स्वतः राहत असलेल्या प्रभागातील जागा अनुसूचित जातीच्या महिलांसाठी राखीव आहे. त्यामुळं इतर प्रभागातील अनुसूचित जाती खुल्या गटातील जागेवर त्यांना अतिक्रमण करावं लागणार आहे. अण्णा बनसोडेंना याबाबत विचारलं असता सिद्धार्थ शंभर टक्के निवडणूक लढणार हे त्यांनी ठामपणे सांगितलं. मात्र कोणत्या प्रभागातून याबाबत त्यांनी खुलासा केला नाही. खराळवाडी, पिंपरी, आनंदनगर अशा पाच ते सहा प्रभागातील एका जागेवर तो लढू शकतो. असं बनसोडे म्हणतात. म्हणजे मुलगा सिद्धार्थ ज्या जागेसाठी बाल हट्ट करेल, त्या जागेवर अतिक्रमण करण्याची बनसोडे यांनी तयारी केलीये. विधानसभा उपाध्यक्ष पद स्वतःकडे असल्यानं ते आता कोणत्या इच्छुकावर दबाव टाकणार, याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे.

यानिमित्ताने घराणेशाहीचा मुद्दा ही पिंपरी चिंचवड शहरात चर्चेत आहे.पुणे महापालिकेची निवडणूक भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) महायुती म्हणून लढवली जाणार आहे. या संदर्भात आज पुण्यात दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे.

# सख्ख्या भावामुळेच शिंदे अडचणीत ?

## पोलीसांनी सुमारे 115 कोटी रूपयांचा 45 किलो ड्रग्सचा साठा जप्त

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सातारा जिल्ह्यातील पाचगणीजवळच्या दरे गावचे रहिवासी. या गावापासून जवळच असलेल्या सावरी येथे मुंबई पोलीसांनी सुमारे ११५ कोटी रूपयांचा ४५ किलो ड्रग्सचा साठा जप्त केला. पोलीसांनी धाड टाकलेले 'हॉटेल तेज यश' हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे सख्खे भाऊ प्रकाश शिंदे यांच्या मालकिचे.**



या हॉटेलचा व्यवसाय दरे गावचे सरपंच रणजीत शिंदे सांभाळतात. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या दबावामुळे या प्रकरणात कारवाई होत नसल्याचा आरोप करत शिवसेना ठाकरे गटाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. संसदेत आणि विधीमंडळाच्या अधिवेशनात शिवसेना ठाकरे गटाचे आमदार ही मागणी करणार असल्याची माहिती शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत केली. शिवसेना ठाकरे गटाने आक्रमक भुमिका घेतल्याने या प्रकरणाची चौकशी निपक्षपणे होणार का? या प्रकरणाचे धागेदोरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना अडचणीत आणाणार का?, असा

## रणजीत शिंदे फरार झाला

त्यानंतर प्रकाश शिंदे यांनी हॉटलेशी आपला काहीही संबंध नसल्याचे सांगून सगळे आरोप फेटाळले. मात्र, प्रकाश शिंदे हे खोटे बोलत आहेत. हॉटेलचे ऑनलाईन बुकिंग प्रकाश शिंदे हेच घेत असून, त्यांचे नाव, मोबाईल क्रमांक त्याठिकाणी आहे. त्यांनी दरे गावचे सरपंच रणजीत शिंदे फरार का झाला, हे सांगावे.'या प्रकरणात पदाचा दुरुपयोग करून तपास यंत्रणावर दबाव टाकला जात आहे. राज्यातील मुले ड्रग नावाखाली देशोधडीला लावले जात आहे, ही बाब चिंताजनक आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला पाहिजे.

सवाल उपस्थित होत आहे.सुषमा अंधारे म्हणाल्या,'पाचगणी हे राज्यातील महत्वाचे पर्यटन स्थळ आहे. मात्र, पाचगणीचा परिसर अंमली पदार्थांच्या विळख्यात सापडला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा भाऊ प्रकाश शिंदे पाचगणीमध्ये 'तेज यश' नावाचे हॉटेल चालवतात. काही काळापासून या हॉटेलचा व्यवसाय रणजीत शिंदे पाहत आहेत. या हॉटलेवर पोलीसांनी ११५ कोटी रूपयांचा ४५ किलो ड्रग्स साठा जप्त केला होता.

## प्रदूषण रोखण्याचा उद्देश: ₹826.62 कोटींचा मेगा आराखडा!

# इंद्रायणी, पवना नद्या प्रदूषणमुक्त होणार!

### इंद्रायणी नदी परिसरातील देहू–आळंदीसह ३० गावे आणि पवना नदी परिसरातील ५४ गावांचा समावेश!

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**देहू–आळंदीसारख्या तीर्थक्षेत्रांना पवित्र करणारी इंद्रायणी आणि पिंपरी-चिंचवडची जीवनवाहिनी असलेली पवना या दोन्ही नद्यांच्या प्रदूषणमुक्तीसाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) एकत्रितपणे मोठा आणि दीर्घकालीन नदीसुधार आराखडा तयार केला आहे. इंद्रायणी नदीसाठी ₹674.13 कोटी तसेच पवना नदीसाठी ₹152.49 कोटी असा एकूण सुमारे ₹826.62 कोटींचा हा प्रकल्प केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त निधीतून राबविण्यात येणार आहे. दोन्ही नद्यांमध्ये थेट सांडपाणी, घनकचरा आणि धार्मिक विधींमधून होणारे प्रदूषण रोखून नदीचे नैसर्गिक आरोग्य पुनर्स्थापित करणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या प्रकल्पांचे सादरीकरण आज, दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी पंडित भीमसेन जोशी कलामंदिर, औंध, पुणे येथे संबंधित गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, शहर अभियंता यांच्या समोर झाले.**



याप्रसंगी महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, मुख्य अभियंता रिनाज पठाण, अधीक्षक अभियंता प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता अनिता कुलकर्णी, उपअभियंता विवेक विसपुते, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी नवनाथ औताडे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपकार्यकारी अभियंता संतोष पाटील, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे येथील उपकार्यकारी अभियंता संतोष गाडेकर तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी उपस्थित होते.

देहू आणि आळंदीसह संपूर्ण पट्ट्यातून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीच्या पुनरुज्जीवनासाठी स्वतंत्र, परंतु समन्वयित असा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आखण्यात आला आहे. इंद्रायणी नदीची एकूण लांबी 105.30 किलोमीटर असून, त्यातील सुमारे 87.5 किलोमीटरचा प्रवाह पीएमआरडीएच्या हद्दीत येतो. सध्या अनेक ठिकाणी प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट नदीत मिसळत असल्याने पाण्याची गुणवत्ता धोकादायक स्तरावर पोहोचली आहे. ही बाब लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाला (डीपीआर) आयआयटी रुडकीकडून तांत्रिक मान्यता मिळाली असून, तो राष्ट्रीय नदी संरक्षण संचालनालयाकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

या प्रकल्पांत आधुनिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, टर्शरी ट्रीटमेंट, काही ठिकाणी विद्यमान प्रकल्पांचे आधुनिकीकरण, तर अनेक गावांमध्ये पहिल्यांदाच भूमिगत गटार व्यवस्था उभारली जाणार आहे. प्रमुख पुलांवर कचरा अडविण्यासाठी लोखंडी जाळ्या, घनकचरा व्यवस्थापन, बायोगॅस प्रकल्प आणि जेटींग मशीनची व्यवस्थाही या आराखड्यात समाविष्ट आहे.

मावळ तालुक्यातील पवना धरणातून उगम पावणारी पवना नदी सुमारे ६० किलोमिटर प्रवास करते. त्यातील ३५ किलोमीटरचा प्रवाह पीएमआरडीएच्या कार्यक्षेत्रात येतो. नदीकाठच्या ग्रामीण भागातील सांडपाणी थेट नदीत सोडले जात असल्याने प्रदूषणाची पातळी वाढली होती. ही स्थिती लक्षात घेऊन ५४ गावांचा समावेश असलेला सर्वंकष आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार ११ गावांमध्ये १४ ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारले जाणार असून, त्यांची एकत्रित क्षमता ५.८४ दशलक्ष लिटर प्रतिदिन इतकी असेल. आधुनिक एमएमबीआर तंत्रज्ञानाच्या आधारे सांडपाणी प्रक्रिया करून ते नदीत सोडले जाणार आहे. याशिवाय ५२ गावांसाठी १४ सामायिक घनकचरा व्यवस्थापन केंद्रे उभारली जाणार असून, ओला व सुका कचरा वेगळा करून त्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. नदीकाठावर होणाऱ्या धार्मिक विधींमुळे निर्माण होणारे प्रदूषण रोखण्यासाठी ३९ सुधारित लाकडी स्मशानभूमी आणि ४ विद्युत दाहिन्यांची उभारणीही प्रस्तावित आहे. प्रकल्प पूर्ण होईपर्यंत जलपर्णी काढणे व पुलांवर लोखंडी संरक्षक जाळ्या बसविण्यात येणार आहेत. दोन्ही प्रकल्पांसाठी ६० टक्के निधी केंद्र सरकारकडून तर ४० टक्के निधी राज्य शासनामार्फत पीएमआरडीएकडून दिला जाणार आहे. एकूण खर्चात प्रकल्पाची १५ वर्षांची देखभाल व संचलन यांचा समावेश करण्यात आला आहे. या संयुक्त प्रयत्नांमुळे इंद्रायणी आणि पवना नद्यांतील प्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी होऊन नदीला तिचे नैसर्गिक, स्वच्छ स्वरूप पुन्हा मिळेल, अशी अपेक्षा पीएमआरडीएकडून या सादरीकरणादरम्यान व्यक्त करण्यात आली आहे. हे सादरीकरण मुख्य अभियंता रिनाज पठाण, अधीक्षक अभियंता प्रशांत पाटील आणि कार्यकारी अभियंता अनिता कुलकर्णी यांनी केले. तसेच सरपंच व उपसरपंचांनी मांडलेल्या शंकांचे निरसनही या अधिकाऱ्यांनी केले. या दोन्ही प्रकल्पांसाठी संबंधित गावांचे सरपंच, उपसरपंच व लोकप्रतिनिधींनी सहकार्य करून प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण होण्यासाठी सहाय्य करावे, असे आवाहन महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी केले. उपस्थितांचे आभार मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी मानले.

### या प्रकल्पाची मुख्य उद्दिष्टे

- **इंद्रायणी नदीमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रदूषित नाल्यांना अडविणे.**
- **कार्यक्षम आणि शाश्वत मलशुद्धीकरण केंद्रे उभारणे.**
- **पर्यावरणीय संतुलनाचे संरक्षण करणे आणि पाण्याची गुणवत्ता सुधारणे.**
- **नदीच्या सांस्कृतिक आणि धार्मिक महत्त्वाचे संरक्षण करणे.**
- **CPCB आणि NGT च्या जलगुणवत्तेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे.**

# महापालिकेच्यावतीने “पेन्शनर्स डे” उत्साहात साजरा

### निवडणुकीत 100 टक्के मतदान करण्याचा शेकडो सेवानिवृत्तांचा निर्धार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**निवृत्तीवेतन ही केवळ आर्थिक तरतूद नसून सेवानिवृत्त व्यक्तींच्या दीर्घ सेवाभावाचा, त्यागाचा आणि योगदानाचा सन्मान आहे. निवृत्त वेतनधारकांनी एकमेकांच्या संपर्कात रहावे आणि संवाद ठेवावा असे प्रतिपादन पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका आणि पिंपरी चिंचवड सेवा निवृत्त सेवक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय सेवानिवृत्त वेतनधारक दिन (पेन्शनर्स डे) निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात करण्यात आले होते, यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमास महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, पुणे जिल्हा कोषागार भवनाचे कोषागार अधिकारी देवराम शेळके, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह हास्यसम्राट फेम ॲड.आनंद खेळकर, पिंपरी चिंचवड सेवानिवृत्त सेवक परिषदेचे अध्यक्ष प्रकाश जवळकर, शिवाजीराव तापकीर, चंद्रकांत झगडे, गणेश विपट, प्रकाश राऊळकर, सुरेश कुंभार, श्रीकांत मोने, प्रल्हाद गिरी गोसावी, श्रीराम परबत, मधू देसाई, डी.डी.फुगे, प्रमोद काशिकर, शहाजी माळी, कुमुदिनी घोडके, विजया जीवतोडे, यशवंत रासकर, मंगला नायडू यांच्यासह विविध शासकीय, निमशासकीय व अन्य क्षेत्रांतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

### निवृत्तीवेतनधारकांनी घेतली मतदानाची शपथ

“आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू” अशी शपथ यावेळी उपस्थितांनी घेतली आणि लोकशाही बळकट करण्यासाठी १०० % मतदान करण्याचा निर्धारही केला.




# गळे कापणारा मांजा...!

**आपली पतंग उडविण्यापेक्षा पतंगबाजी ही कापाकापीची झाली आहे. एकमेकांच्या पतंग कापल्याशिवाय हा पतंग उत्सव साजराच होत नाही. यातून अनेकदा मोठे अपघात झाले आहेत. अनेक मुले गच्चीवरून खाली कोसळून मृत्युमुखी पडले आहेत. कटलेली पतंग मिळविण्यासाठी रस्त्याने धडपडणारी मुले अपघात होऊन जखमी झालेली आहेत किंवा दुसऱ्यांचा अपघात करण्यास तरी कारणीभूत ठरली आहेत.**



एवढे सगळे प्रकार होऊनही या प्रकारांना आळा मात्र घातला गेलेला नाही. त्यातच गेल्या काही वर्षांपासून वापरला जाणारा चायनीज मांजा माणसांसह पक्षांच्या आणि जनावरांच्या जीवावर उठला आहे. जानेवारीची चाहूल लागली की रस्त्याने चालताना, दुचाकी चालवताना माणसांना आणि पक्षांनाही आपला गळा कधी कापला जाईल याची शाश्वती राहिलेली नाही. मांजा शौकिनांना मांजाचे दुष्परिणाम माहिती असूनही ते असे बेदरकारपणे कसे वागू शकतात, हा खरा प्रश्न आहे. कायद्याने आता मांजा वापरण्यावर बंदी असून पतंग उडविण्यासाठी जर मुले मांजाचा वापर करत असतील तर या मुलांवर आणि त्यांच्या पालकांवरही कारवाई करण्याची तरतूद आहे. पोलिसांनी या तरतुदीचा वापर करून काही कारवाया जरूर करायला हव्यात... हिवाळ्याच्या दिवसात कोवळ्या उन्हात पतंग उडवताना मिळणारा आनंद काही वेगळाच असतो, पण आपल्या या आनंदामुळे कुणाला त्रास होत असेल किंवा कोणाचे गळे कापले जात असतील तर त्याची खबरदारी घेण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. सध्या गल्लोगल्ली आणि घराच्या प्रत्येक छतावर, गच्चीवर मुलांचा हल्लकल्लोळ ऐकायला मिळतो. एकमेकांच्या पतंग कापण्यासाठी मुलांमध्ये जणू स्पर्धा लागलेली असते. म्हणून एकाच दिवशी आठ ते दहा पतंग असल्या तरी आणि मांजाची अनेक बंडले असले तरी कमी पडतात, असा हा छंद आहे. मी या संदर्भात सुरुवातीपासूनच मांजाचा विरोधक आहे. पतंग उडवण्यातही मला तसे काही जास्त स्वारस्य नाही. माझा मुलगा जेव्हा मला गमतीने विचारतो बाबा तुम्ही पतंग उडवत नव्हते काय, तेव्हा मी त्याला सांगितले, की मी एक पतंग खरेदी केल्यानंतर मला ती पाच सहा महिने पुरायची. त्याने विचारले... कशी? त्याला मी सांगितले, पतंग आणि धागा घेऊन गच्चीवर जायचे... पतंग उडवायची आणि संध्याकाळी आपली पतंग खाली उतरवून धागा गुंडाळून धागा आणि पतंग व्यवस्थित ठेवून द्यायची. आता तशी पद्धत राहिलेली नाही. कदाचित राजकीय पतंगबाजीचा हा परिणाम असावा... आपली पतंग उडविण्यापेक्षा पतंगबाजी ही कापाकापीची झाली आहे. एकमेकांच्या पतंग कापल्याशिवाय हा पतंग उत्सव साजराच होत नाही. यातून अनेकदा मोठे अपघात झाले आहेत. अनेक मुले गच्चीवरून खाली कोसळून मृत्युमुखी पडले आहेत. कटलेली पतंग मिळविण्यासाठी रस्त्याने धडपडणारी मुले अपघात होऊन जखमी झालेली आहेत किंवा दुसऱ्यांचा अपघात करण्यास तरी कारणीभूत ठरली आहेत. एवढे सगळे प्रकार होऊनही या प्रकारांना आळा मात्र घातला गेलेला नाही. त्यातच गेल्या काही वर्षांपासून वापरला जाणारा चायनीज मांजा माणसांसह पक्षांच्या आणि जनावरांच्या जीवावर उठला आहे. या मांजाच्या पतंगबाजीमुळे अनेक पक्षांना हवेतच आपला जीव गमवावा लागतो तर अनेक माणसांनाही यामुळे आपला जीव गमवावा लागला किंवा गंभीर जखमी तरी व्हावे लागले. गेल्या वर्षी अकोल्यातच अशा काही घटना घडलेल्या आहेत. ही बाब लक्षात घेऊन शासनाने या मांजावर बंदी आणलेली आहे, तरीही काही महाभाग पैशांच्या लालचे पोटी या मनाची विक्री करतात. खरे तर या मांजा वापरणाऱ्यांपेक्षा या मांजाची विक्री करणाऱ्यांचे गळे आवळायला हवेत. अर्थात त्यासाठी कायदेशीर मार्ग असल्याने पोलिसांनी पतंगांचा मोसम सुरू होण्यापूर्वीच या कारवाया वाढवायला हव्यात. अगोदर संक्रांतीच्या दिवशी किंवा अगोदर एक-दोन दिवस ही पतंगबाजी चालायची. आता नोव्हेंबर- डिसेंबर पासूनच मुले पतंग उडवायला सुरुवात करतात. घरांच्या छतावर मोठ्या आवाजात डीजे लावून पतंगांची कापाकापी करताना एखादा अपघात होऊन अनेकांच्या घरावरून विद्युत तारा गेलेल्या असतात. ही पतंगबाजी करताना या तारांना स्पर्श होऊनही अनेक मुलांचे जीव आतापर्यंत गेलेले आहेत.

## संपादकीय »

### किती नामांतर

*ग्रामीण भागात होणारी रोजगाराची उपलब्धता स्थलांतर कमी करण्यास मदत करील.*

केंद्र सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेचे विधेयक संसदेत सादर केले. कोणत्याही कायद्यात बदल करण्याचा अधिकार केंद्र सरकारला असतो. कालानुरूप कायद्यात बदलही करावा लागतो.

तसा बदल करण्यात गैर काहीच नाही;परंतु हे करताना सरकारचा हेतू स्वच्छ आहे का, हे पाहिले पाहिजे. गांधी-नेहरू कुटुंबांशी संबंधित तीसहून अधिक योजनांची नावे सरकारने बदलले. स्वतःची रेषा मोठी करण्याऐवजी दुसऱ्याची रेषा पुसण्याचा जो प्रकार असतो, तसा प्रकार केंद्र सरकार करीत आहे. आता केंद्र सरकार महात्मा गांधी यांच्या नावाने असलेल्या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे नाव बदलून 'विकसित भारत-रोजगार आणि अजीविका मिशन (ग्रामीण) असे आहे. या विधेयकानुसार, ज्यांचे प्रौढ सदस्य कोणत्याही विशेष कौशल्याशिवाय हाताने काम करण्यास तयार आहेत, त्यांना आर्थिक वर्षात १२५ दिवसांच्या पगारी रोजगाराची कायदेशीर हमी दिली जाईल.

सावकारीवर चाप बसवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४' कायदा आणला आहे, जो बेकायदेशीर सावकारांना आळा घालतो आणि या कायद्यांतर्गत शिक्षेची तरतूद आहे, तसेच या कायद्यात वेळोवेळी सुधारणा करून कारवाईची व्याप्ती वाढवली जात आहे.

# बेकायदा पाशातून सुटका कधी ?



सावकारांनी बेकायदेशीपणे अनेकांची संपत्ती, शेती हडपून घेतली आहे. एवढेच नव्हे, तर सावकार दामदुप्पट रक्कम वसूल करत असून कर्जदाराला शेती व किडनी विकण्याची वेळ येत आहे. चंद्रपूरच्या शेतकऱ्यानं कंबोडियाला जाऊन किडनी विकल्याची धक्कादायक घटना नुकतीच समोर आली आहे. सावकाराचं एक लाखाचं कर्ज ७४ लाखांवर गेलं. चंद्रपूर जिल्ह्यातून माणुसकीला काळीमा फासणारी धक्कादाय घडल्याची समोर आली आहे. कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या एका शेतकऱ्याला सावकारांनी थेट स्वतःची किडनी विकण्यास भाग पडल्याचा अमानवी प्रकार समोर आला आहे. शेतीसोबत पूरक व्यवसायासाठी खाजगी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी शेतकऱ्याने आठ लाख रुपयात किडनी विकल्याची धक्कादायक घटना नागभीड तालुक्यात घडली. या प्रकारामुळे महाराष्ट्र हादरला असून पुरोगामी राज्यात कर्ज फेडण्यासाठी किडनी विकावी लागत असल्याने असंतोष व्यक्त केला जात आहे. सावकाराच्या जाचाला कंटाळून किडनी विकणाऱ्या चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या वडिलांनी त्यांचा मुलगा सावकारी पाशात कसा फसत गेला आणि अखेर त्याला आपली किडनी का विकावी लागली, याची विस्तृत हृदयद्रावक इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या कॅमेरासमोर मांडली आहे. कोरोना काळात डबघाईला आलेला दुधाचा व्यवसाय आणि त्यानंतर आलेल्या लंपी आजारामुळे त्या शेतकऱ्याने सावकाराकडून घेतलेले अवघे एक लाख रुपयांचे कर्ज तो फेडू शकला नाही. मात्र दुसरीकडे सावकार त्याला पद्धतशीर आपल्या जाळ्यात अडकवत राहिले. व्याजावर व्याज चढवत लाखो रुपयांची रक्कम त्याच्याकडून लाटली आणि अखेर त्याला किडनी विकण्यास भाग पाडलं, अशी व्यथा शेतकऱ्याच्या वडिलांनी मांडली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात एका सावकाराने आपले कर्जाचे पैसे वसूल करण्यासाठी शेतकऱ्याला अक्षरशः स्वतःला विकायला लावल्याच्या घटनेनं संपूर्ण राज्यात एकच खळबळ उडालीय. शेतकऱ्यांची होरपळ किती विदारक असू शकते, याचे मूर्तिमंत उदाहरण चंद्रपूरातून समोर आलं आणि साऱ्यांनाच या घटनेनं धक्काच बसला. कायदा असून देखील सावकारांची बेकायदेशीर वृत्ती दिवसेंदिवस वाढत आहे. सावकारांची बेबंदशाही वाढत आहे. सावकाराचे कर्ज चुकवून देखील सावकार दामदुप्पट वसुली करत असल्याने अनेकांनी आत्महत्या देखील केलेल्या आहेत. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**कामात स्थानिकांवर अन्याय**

## टाटा प्रकल्प विरोधातील आंदोलनकर्त्यांची माघार

# अखेर उपोषण 12 तासांनी सुटलं

## मोठा पोलीस बंदोबस्त तैनात




। मुंबई ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**तालुक्यातील भिवपुरी येथे असलेल्या टाटा जलविद्युत प्रकल्पाच्या नवीन प्रकल्पाच्या कामात स्थानिकांवर अन्याय होत असल्याचे कारणाने राष्ट्रवादी काँग्रेस,शिवसेना ठाकरे पक्ष आणि शेतकरी कामगार पक्षाने उपोषण सुरू केले होते. त्या उपोषणाला स्थानिक आणि तालुक्यातील जनतेने मोठा पाठिंबा दिल्याने तणाव निर्माण झाला होता. शेवटी तब्बल 11 तासांनी टाटा कंपनी व्यवस्थापनाला उपोषणकर्त्यांच्या सर्व मागण्या मान्य कराव्या लागल्या. दरम्यान या निमित्ताने तिन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.**

कर्जत तालुक्यातील टाटा पॉवर हाऊस येथे स्थानिक भूमिपुत्रांच्या अनेक मागण्यांसाठी उपोषण सुरू केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उप जिल्हाप्रमुख नितीन सावंत,शेकापचे तालुका चिटणीस तानाजी मते आणि जिल्हा परिषदेचे माजी सभापती नारायण डामसे यांनी सकाळी उपोषणाला सुरुवात केली होती. 17 डिसेंबर रोजी उपोषणाला सुरुवात झाल्यानंतर उपोषणाला स्थानिक ग्रामस्थांनी मोठी उपस्थिती लावल्याने शेवटी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करावा लागला होता. उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये सुरुंग स्फोटामुळे तपकीरवाडी आणि धनगर वाडा येथील घरांचे होत असलेले नुकसान आणि त्यामुळे निर्माण झालेली घबराट,सुरुंग स्फोटामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई,दगडखानी यांना लोकवस्ती जवळ दिलेली परवानगी,मोठ्या प्रमाणावर केलेली वृक्षतोड आणि स्थानिक भूमिपुत्र यांना नोकऱ्यांमध्ये सामावून घेण्याच्या मागण्यांसाठी उपोषण सुरू करण्यात आले होते. उपोषण सुरू झाल्यानंतर कर्जत तालुक्याचे प्रांत अधिकारी प्रकाश संकपाल,तालुक्याचे तहसीलदार डॉ धनंजय जाधव,टाटा अधिकारी टाटा कंपनीचे अधिकारी अभिजीत पाटील,सीबी सिंग,मुंबई ऑफिस वसंत पिंगळे,विवेक माटे यांनी दुपार एक वाजता,त्यानंतर संध्याकाळी पाच वाजता आणि रात्री नऊ वाजता मध्यस्थी करण्यासाठी उपोषण स्थळी येऊन चर्चा केली. मात्र उपोषणकर्त्यांच्या मागण्या सुटत नाहीत तोवर उपोषण सुरूच ठेवले जाईल अशी भूमिका कायम ठेवली होती.स्थानिकांना न्याय मिळवून देण्यासाठी उपोषणकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ नेते पुंडलिक पाटील,पंढरीनाथ राऊत यांच्याकडून कंपनी व्यवस्थापन यांच्याशी बोलणी केली जात होती. शेवटी रात्री दहा वाजता उपोषणकर्त्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्याने 12 तासांनी उपोषण स्थगित करण्यात आले. मात्र दुपारपासून असलेली गर्दी आणि अचानक रात्री नऊ नंतर वाढलेली गर्दी यामुळे पोलीस प्रशासनाने कंपनी व्यवस्थापन यांना निर्णायक भूमिका जाहीर करण्याची सूचना केली. त्यानंतर कंपनी व्यवस्थापन कडून अभिजित पाटील यांनी समजूतदार पणाची भूमिका घेऊन सर्व मागण्या मान्य करणारे पत्र मुंबईतून मंजूर करून घेतले आणि उपोषण स्थगित झाले. कायदा सुव्यवस्था यांचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी जिल्हा अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजित,पोलिस उप अधीक्षक राहुल गायकवाड आणि पोलिस निरीक्षक संदीप भोसले यांच्याकडून वेळोवेळी पाहणी केली जात होती.

### रात्री नऊ वाजता मध्यस्थी

रात्री नऊ नंतर सर्व बाजूंनी दबाव वाढू लागला आणि कार्यकर्ते स्थानिक ग्रामस्थ कंपनी गेटवर गोंधळ घालू लागल्याने तणावाची स्थिती निर्माण झाली होती.टाटा जलविद्युत प्रकल्पाच्या नवीन प्रकल्पाच्या कामात स्थानिकांवर अन्याय होत असल्याचे कारणाने राष्ट्रवादी काँग्रेस,शिवसेना ठाकरे पक्ष आणि शेतकरी कामगार पक्षाने उपोषण सुरू केले होते.

# आता लोकलचा प्रवास होणार आरमदायी!

## 238 नवीन ट्रेनमध्ये असणार स्वयंचलित दरवाजे

। मुंबई ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मुंबईची लाईफलाईन असणाऱ्या प्रवाशांसाठी खूशखबर असून आता लोकलचा प्रवास आता आरामदायी होण्याची शक्यता आहे. कारण केंद्र सरकारकडून लोकल निर्मितीसाठी महत्त्वाचा विचार करण्यात आला आहे. लोकल ट्रेन सेवेचे आधुनिकीकरण आणि ती अधिक सुरक्षित करण्यासाठी मोठी पावले उचलली जात आहेत.**

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या मते, उपनगरीय रेल्वे नेटवर्कची क्षमता वाढविण्याबरोबरच, प्रवाशांच्या सुरक्षेवर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. नवीन तंत्रज्ञान, स्वयंचलित दरवाजे प्रणाली आणि सुधारित कनेक्टिव्हिटी लवकरच मुंबई लोकल ट्रेन प्रवासात बदल घडवून आणतील.मुंबईची जीवनरेखा मानली जाणारी लोकल ट्रेन सेवा मोठ्या प्रमाणात बदलत आहे.




दररोज लाखो प्रवाशांना वाहून नेणारी ही उपनगरीय रेल्वे प्रणाली सुरक्षित, अधिक सोयीस्कर आणि आधुनिक करण्यासाठी केंद्र सरकारने अनेक महत्त्वाची पावले उचलली आहेत. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या मते, मुंबई लोकल नेटवर्कची क्षमता वाढविण्याबरोबरच प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. या उपक्रमांचा थेट फायदा आता चांगल्या आणि अधिक विश्वासार्ह प्रवासाचा अनुभव घेणाऱ्या प्रवाशांना होईल.प्रवाशांची सुरक्षा वाढवण्यासाठी २३८ नवीन मुंबई लोकल ट्रेनमध्ये स्वयंचलित दरवाजे प्रणाली बसवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे चालत्या गाड्यांमधून पडणे यासारखे अपघात टाळण्यास मदत होईल, जे मुंबई लोकल गाड्यांसाठी एक मोठे आव्हान बनले आहे. गर्दीच्या वेळी दरवाज्यांना चिकटून राहण्याची सक्ती हळूहळू कमी होईल. रेल्वेचा असा विश्वास आहे की स्वयंचलित दरवाजे असल्याने गाड्या अधिक सुरक्षित होतील आणि प्रवाशांचा प्रवास करण्याचा आत्मविश्वासही वाढेल.प्रवाशांच्या सोयीसाठी, पालघर स्थानकावर थांबण्यासाठी नवीन गाड्या जोडण्यात आल्या आहेत. यामुळे या भागातील दैनंदिन प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. सध्या पालघर स्थानकावरून एकूण १०४ गाड्या जातात, ज्यामध्ये ४६ मेल-एक्सप्रेस, १६ प्रवासी आणि ४२ उपनगरीय गाड्यांचा समावेश आहे. नवीन थांबे प्रवाशांना लांब पल्ल्याचा प्रवास करण्याची गरज दूर करतील आणि प्रवासाचा वेळ वाचवतील.

### पालघर स्थानकाला नवीन थांबे

बोईसर स्थानक मुंबई उपनगरीय रेल्वे नेटवर्कचे एक महत्त्वाचे केंद्र बनत आहे. येथून एकूण ९९ गाड्या धावतात, ज्यात ४१ मेल-एक्सप्रेस, १६ प्रवासी आणि ४२ लोकल गाड्यांचा समावेश आहे. सुधारित कनेक्टिव्हिटीमुळे बोईसरहून मुंबई आणि आसपासच्या भागात पोहोचणे सोपे झाले आहे.

**'हिजाब' वाद नडला!**

## नितीश कुमार यांना जीवे मारण्याची धमकी

# बिहारमध्ये 'हाय अलर्ट'!

## बिहार पोलीस हाय अलर्टवर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार (CM NITISH KUMAR) यांच्या सुरक्षेत अचानक मोठी वाढ करण्यात आली आहे. एका सार्वजनिक कार्यक्रमात मुस्लिम महिलेच्या चेहऱ्यावरून 'हिजाब' काढल्याच्या वादग्रस्त प्रकरणावरून त्यांना सोशल मीडियाद्वारे धमक्या मिळत असल्याची माहिती समोर आली आहे. गुप्तचर यंत्रणांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर बिहार पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांना 'हाय अलर्ट'वर ठेवण्यात आले आहे.**



नितीश कुमार यांच्या सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी पोलीस महासंचालक (DGP) आणि अतिरिक्त महासंचालक (SSG) यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर निर्णय घेण्यात आले. विशेष सुरक्षा गटाला मुख्यमंत्र्यांच्या संरक्षणासाठी अधिक सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. आता केवळ निवडक आणि उच्च-प्रोफाइल व्यक्तींनाच मुख्यमंत्र्यांच्या जवळ जाण्याची परवानगी असेल. राज्यातील सर्व एसएसपी (SSP) आणि पोलीस अधीक्षकांना (SP) आपापल्या भागात विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.गुप्तचर यंत्रणांच्या अहवालानुसार, हिजाब प्रकरणानंतर काही कट्टरपंथी आणि समाजकंटक घटकांमध्ये मोठा संताप आहे. सोशल मीडियावरून मुख्यमंत्र्यांना लक्ष्य करण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. यामुळे मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान, सार्वजनिक कार्यक्रम आणि त्यांच्या प्रवासादरम्यानचा सुरक्षा ताफा अधिक मजबूत करण्यात आला आहे.सोशल मीडियावर नितीश कुमार यांचा एक व्हिडिओ वेगाने व्हायरल होत आहे, ज्यावरून हा सर्व वाद निर्माण झाला. एका सरकारी कार्यक्रमात मुख्यमंत्री नितीश कुमार मुस्लिम महिला डॉक्टरांना नियुक्ती पत्र देत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अचानक त्या महिला डॉक्टरच्या चेहऱ्यावरून हिजाब काढला. मंचावर उपस्थित असलेले उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्र्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत ही घटना कॅमेऱ्यात कैद झाली होती. या कृतीमुळे मुस्लिम समुदायातून आणि विरोधी पक्षांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, याच रागातून मुख्यमंत्र्यांना धमक्या मिळत असल्याचे बोलले जात आहे.बॉलिवूड फेम 'दंगल गर्ल' झायरा वसीमने अतिशय संतापजनक प्रतिक्रिया दिली आहे. चित्रपटांपासून दूर असली तरी सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या झायराने (पूर्वीचे ट्विटर) एक पोस्ट शेअर केली आणि नितीश कुमार यांनी बिनशर्त माफी मागावी, अशी मागणी केली. एका महिलेची प्रतिष्ठा आणि शिष्टाचार हे खेळण्यासारखे खेळणे नाही, विशेषतः सार्वजनिक व्यासपीठावर नाही. एक मुस्लिम महिला म्हणून, दुसऱ्या महिलेचा बुरखा इतक्या सहजपणे खाली ओढलेला पाहणे अत्यंत अपमानजनक होते, त्यासोबत ते बेफिकीर हास्य होते. सत्ता म्हणजे सीमा ओलांडणे असे नाही. नितीश कुमार यांनी त्या महिलेची बिनशर्त माफी मागावी. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या सुरक्षेत अचानक मोठी वाढ करण्यात आली आहे. एका सार्वजनिक कार्यक्रमात मुस्लिम महिलेच्या चेहऱ्यावरून 'हिजाब' काढल्याच्या वादग्रस्त प्रकरणावरून त्यांना सोशल मीडियाद्वारे धमक्या मिळत असल्याची माहिती समोर आली

### संशयितांवर पोलिसांची नजर

गुप्तचर यंत्रणांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर बिहार पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांना 'हाय अलर्ट'वर ठेवण्यात आले आहे. नितीश कुमार यांच्या सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी पोलीस महासंचालक (DGP) आणि अतिरिक्त महासंचालक (SSG) यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर निर्णय घेण्यात आले. विशेष सुरक्षा गटाला मुख्यमंत्र्यांच्या संरक्षणासाठी अधिक सतर्क राहण्याचे आदेश दिले .

# लोकसभा आहे की कुस्तीचा आखाडा?

## B-G RAM-G बिल पास होताच खासदारांनी केली फेकाफेकी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सध्या संसदेमध्ये हिवाळी अधिवेशन सुरु आहे. विविध विषयांवर जोरदार चर्चा सुरु आहे, MGNREGA योजनेचे नामांतर केले जाणार आहे. मनरेगाऐवजी येणारे विकास भारत – रोजगार आणि उपजीविका अभियान (ग्रामीण) विधेयक, २०२५ (VB-G RAM-G विधेयक) लोकसभेत मंजूर झाले आहे.**

जोरदार वादाच्या भोवऱ्यात अडकलेले हे विधेयक मंजूर झाल्यानंतर विरोधकांनी सभागृहात जोरदार गोंधळ घातला. विरोधकांनी विधेयकाची प्रत फाडली. त्यामुळे हे नक्की देशाचे संसद आहे की कुस्तीचा आखाडा असा प्रश्न निर्माण झाला आहे.MGNREGA योजनेचे नामांतराच्या या विधेयकामध्ये योजनेचे नवीन नाव हे VB-G RAM G असे नाव देण्यात आले आहे. विधेयकावर दीर्घ चर्चेनंतर अखेर ते मंजूर झाले. नाव बदलणारे हे विधेयक लोकसभेत मंजूर होताच, विरोधी पक्षांच्या खासदारांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. त्याआधी काही खासदारांनी वेलमध्ये पोहोचून विधेयकाची प्रत फाडली आणि ती केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या दिशेने फेकली. यामुळे



आता लोकसभेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.मनरेगा योजनेचे "जी राम जी" असे नामकरण करण्याबाबत लोकसभेत झालेल्या चर्चेदरम्यान ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले, "आम्ही महात्मा गांधींच्या आदर्शांचे पालन करतो आणि कोणत्याही राज्याशी भेदभाव करत नाही." त्यांनी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या कवितेतील ओळीही वाचल्या.

आमचे विचार मर्यादित किंवा संकुचित नाहीत

शिवराज सिंह चौहान म्हणाले की, "त्यांनी या विधेयकावर माननीय सदस्यांचे म्हणणे पहाटे १:३० वाजेपर्यंत ऐकले होते आणि प्रतिसाद देणे हा त्यांचा अधिकार आहे. काँग्रेस पक्षावर निशाणा साधत ते म्हणाले की, "एखाद्याचे विचार मांडल्यानंतर प्रतिसाद न ऐकणे हे लोकशाही नियमांचे उल्लंघन आहे आणि संविधानाच्या भावनेविरुद्ध आहे. शिवराज यांनी या संपूर्ण गोंधळाला ग्रामीण विकासाचा विरोध असल्याचे म्हटले. त्यांनी पुन्हा सांगितले की आम्ही कोणत्याही राज्याशी भेदभाव करत नाही. संपूर्ण देश आमच्यासाठी एक आहे आणि आमचे विचार मर्यादित किंवा संकुचित नाहीत."

### जुन्या कायद्यात काय बदल होणार?

मनरेगा, किंवा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५, हा जगातील सर्वात मोठा रोजगार हमी कार्यक्रम आहे. त्याचा उद्देश प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला वर्षातून किमान १०० दिवस काम मिळावे हा होता. जर १५ दिवसांत काम मिळाले नाही तर बेरोजगारी भत्त्याची तरतूद होती. २०२२-२३ पर्यंत, त्यात १५४ दशलक्ष सक्रिय कामगार होते. आता सरकार ही रचना बदलत आहे.

# ट्रेंडिंग गाण्यावर सोनाली कुलकर्णीचा जबरदस्त डान्स

'वो लडकी है कहा...' या गाण्याचं नाव जरी घेतलं तरीही डोळ्यासमोर येते ती मराठीसह बॉलीवूड कलाविश्व गाजवणारी सो-कूल अभिनेत्री सोनाली कुलकर्णी. सध्या सोशल मीडियावर संजू राठोडच्या 'शेकी' गाण्याने धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळत आहे. आता सोनालीला सुद्धा या गाण्याची भुरळ पडली असून, अभिनेत्रीने या गाण्यावर सुंदर डान्स करत सर्वांचं मन जिंकून घेतलं आहे. एप्रिल महिन्याच्या अखेरीस संजू राठोडचं 'शेकी' गाणं सर्वत्र प्रदर्शित करण्यात आलं. यापूर्वी संजूच्या 'नऊवारी', 'गुलाबी साडी', 'काळी बिंदी' या गाण्यांनी सोशल मीडियावर रेकॉर्डब्रेकिंग व्ह्यूज मिळवल्याचं पाहायला मिळालं होतं. त्यामुळे 'शेकी' गाण्याकडून सुद्धा सर्वांना प्रचंड अपेक्षा होत्या. अवघ्या महिन्याभरातच 'शेकी' गाण्याने जगभरात पसंती मिळवली आहे.नेटकऱ्यांपासून ते बॉलीवूड सेलिब्रिटींपर्यंत प्रत्येकजण इन्स्टाग्राम रील्सवर संजू राठोडच्या व्हायरल गाण्यावर डान्स करत असल्याचं पाहायला मिळत आहे. अभिनेत्री सोनाली कुलकर्णीने देखील "एक नंबर तुझी कंबर..." म्हणत संजूच्या ट्रेंडिंग गाण्यावर ठेका धरला. अभिनेत्री या व्हिडीओमध्ये जबरदस्त एनर्जीने डान्स करत असल्याचं पाहायला मिळत आहे.सोनालीने 'शेकी' गाण्यावर डान्स करतानाचा व्हिडीओ शेअर करत, "ट्रेंडिंग विथ ट्रेंड... शेकी-शेकी" असं कॅप्शन दिलं आहे. सोनालीच्या डान्स व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. कुशल बद्रिके, नम्रता संभेराव या कलाकारांनी सोनालीच्या डान्स व्हिडीओवर कौतुकास्पद कमेंट्स केल्या आहेत. याशिवाय नेटकऱ्यांनी सुद्धा अभिनेत्रीच्या व्हिडीओवर कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. "अरे वाह! ताई सुंदर डान्स केलात", "वाह! क्या बात है", "अमेझिंग डान्स केलात ताई", "सो-कूल अतिशय छान", "ऑल टाइम आवडती अभिनेत्री", "एव्हरग्रीन सोनाली" अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी अभिनेत्रीच्या डान्स व्हिडीओवर दिल्या आहेत.दरम्यान, सोनाली कुलकर्णीच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं, तर नुकतीच ती 'सुशीला सुजीत' चित्रपटात झळकली होती. या सिनेमाचं दिग्दर्शन अभिनेता प्रसाद ओकने केलं आहे. याशिवाय सोनालीने 'मानवत मर्डर्स'मध्ये साकारलेल्या भूमिकेसाठी नुकताच तिचा नामांकित पुरस्काराने सन्मान देखील करण्यात आला आहे.

## सोनारीकावर गुन्हा दाखल !

काही दिवसांपुर्वी बालकलाकार साईशा भोईरची आई पूजा भोईला आर्थिक फसवणुक केली म्हणुन अटक करण्यात आली. आता आणखी एका अभिनेत्रीने एका व्यक्तीची फसवणुक केल्याचा आरोप करण्यात आलाय. ही अभिनेत्री म्हणजे सोनारीका भदोरिया. सोनारीका भदोरिया हिने देवो के देव या लोकप्रिय टीव्ही मालिकेत अभिनय केलाय. सोनारीकाविरुद्ध आर्थिक फसवणुक झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलाय. सोनारिका भदोरिया ही मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री. सोनारिकाने आजवर अनेक हिंदी मालिकांमध्ये लोकप्रिय भुमिका साकारल्या आहेत. सोनारिका विरोधात माहिम येथील शाहू नगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आलीय. सोनारिका तिच्या इंन्स्टाग्राम स्टोरीवर एक जाहिरात ठेवली होती. त्या जाहीरातीत

## रेवतीचा मराठी गाण्यावर डान्स



झी मराठी वाहिनीवरील अल्पावधीतच लोकप्रिय झालेली मालिका म्हणजे 'नवरी मिळे हिटलरला' ही मालिका. या मालिकेत अभिनेत्री वल्लरी विराज आणि राकेश बापट यांच्या मुख्य भूमिका होत्या. काही दिवसांपूर्वीच मालिकेने प्रेक्षकांचा निरोप घेतला. मात्र तरीसुद्धा ही मालिका प्रेक्षकांच्या आठवणीत आहेत. या मालिकेत लीला आणि एजे यांच्यातील खास नात्याला प्रेक्षकांनी पसंती दिलीच; मात्र लीला आणि तिची बहीण रेवती या दोघींचे नातेही प्रेक्षकांना तितकंच भावलं. याचं कारण म्हणजे त्यांचे नाते हे पडद्यावरील मालिकेत जितकं सुंदर होतं, तितकंच ते नातं ऑफस्क्रीनसुद्धा सुंदरच आहे.मालिकेत लीलाची भूमिका साकारणारी वल्लरी आणि रेवतीची भूमिका साकारणारी आलापिनी या दोघीही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतात. सोशल मीडियावर दोघी त्यांचे अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करत असतात. विशेष म्हणजे त्या दोघींच्या डान्सला चाहत्यांकडून विशेष पसंती मिळत असते.वल्लरी आणि आलापिनी सोशल मीडियावर त्यांचे अनेक डान्सचे व्हिडीओ शेअर करत असतात आणि त्यांचा प्रत्येक डान्स व्हिडीओ चाहत्यांचे लक्ष्य वेधून घेताना दिसतो. अशातच दोघींनी नुकताच एक नवीन डान्स व्हिडीओ शेअर केला आहे. 'चिंब भिजलेले' या लोकप्रिय मराठी गाण्यावरील हा डान्स व्हिडीओ आहे.या व्हिडीओमध्ये दोघींपैकी एकीला (वल्लरी) पाऊस आवडत नाहीय; तर एकीला (आलापिनी) पाऊस प्रचंड आवडत आहे. या संकल्पनेवरच दोघींनी सादरीकरण केलं आहे. बिल्डिंगच्या बाल्कनीमध्ये त्यांनी या गाण्याचं खास सादरीकरण केलं आहे. त्यात दोघींच्या चेहऱ्यावरील हावभाव अगदी कौतुकास्पदच आहेत.वल्लरी आणि आलापिनी यांच्या या डान्स व्हिडीओला अवघ्या काही क्षणांत एक लाख तीन हजार व्ह्यूज मिळाले आहेत. तर दोनशेहून अधिक नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. चाहत्यांनाच नव्हे तर अनेक कलाकारांनासुद्धा या व्हिडीओवर त्यांच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.अभिनेत्री ऋजुता देशमुख, भुमिजा पाटील, विजया बाबर, ऋतुजा जुन्नरकर, सीमा घोगळे यांसह अनेक कलाकारांनी या व्हिडीओवर त्यांना दोघींचंअ डान्स आवडल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. त्याचबरोबर मालिकेच्या अनेक फॅन पेजेसनीसुद्धा या व्हिडीओला लाईक्स आणि कमेंट्सद्वारे पसंती दर्शवली आहे.


## पापाराझींबद्दल काजोलने व्यक्त केला राग

लोकप्रिय अभिनेत्री काजोलने अनेक चित्रपटांमध्ये विविध भूमिका साकारत ९०च्या काळात प्रेक्षकांच्या मनावर जणू राज्य केलं होतं. त्या काळातील ती प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक होती. तिची व अभिनेता शाहरुख खानची जोडी हिंदी चित्रपटांमधील सुपरहिट जोडी मानली जायची. अशातच सध्या अभिनेत्री चर्चेत आहे ते तिच्या 'माँ' या आगामी चित्रपटामुळे. त्यामध्ये ती मुख्य भूमिकेत झळकणार आहे. काजोलने तिच्या 'माँ' या चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान काही मुलाखती दिल्या. त्यातील एका मुलाखतीमध्ये तिने पापाराझींबद्दल मत व्यक्त केलं आहे. काजोल नेहमीच ठामपणे तिची मतं मांडत असते. यामध्येसुद्धा तिने पापाराझींबद्दलचं तिचं मत स्पष्टपणे मांडलं आहे. 'झूम'शी संवाद साधताना ती याबद्दल म्हणाली, "मी स्पष्ट बोलते म्हणून जर तुम्हाला माझी भीती वाटत असेल, तर माझी काहीच हरकत नाही. उलट तुम्ही तर माझा 'माँ' चित्रपट पाहिलाच पाहिजे. कारण- आताच्या घडीला व्हिडीओला फार महत्त्व आहे".काजोल पुढे म्हणाली, "पापाराझींबाबतही तसंच आहे. तुम्ही काहीतरी बोलावं यासाठी ते थांबलेले असतात. कधी कधी तर ते तुम्हाला बोलण्यास भाग पाडतात. तुम्ही चिडणार किंवा बोलणार हे त्यांना माहीत असतं म्हणून मुद्दाम आग्रह केला जातो. पापाराझी फक्त चांगले फोटो किंवा व्हिडीओ काढण्यासाठी थांबलेले नसतात, तर बऱ्याचदा त्यांना कलाकारांच्या प्रतिक्रिया हव्या असतात. जेणेकरून त्यांना त्या त्यांच्या सोईनुसार नकारात्मक पद्धतीनं वापरता येतील. कारण- कलाकरांच्या प्रतिक्रिया मिळाल्यानंतर ते त्यांना हवं तसं शीर्षक देतात".

# सोनाक्षी सिन्हाने सांगितली झहीर इक्बालबरोबरच्या नात्याची खास गोष्ट

बॉलीवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बाल यांनी गेल्या वर्षी २३ जून रोजी एकमेकांशी लग्नगाठ बांधली. नुकतंच त्यांच्या लग्नाला एक वर्ष पूर्ण झालं. सात वर्षं एकमेकांना डेट केल्यानंतर दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. कुटुंबीय आणि काही जवळच्या मित्रमंडळींच्या उपस्थितीत नोंदणी पद्धतीनं त्यांनी लग्न केलं. त्याच दिवशी या जोडप्यानं भव्य रिसेप्शन पार्टीही आयोजित केली होती. सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बाल यांच्या लव्हस्टोरीत एका प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्याची महत्त्वाची भूमिका आहे आणि हा अभिनेता म्हणजे सलमान खान. स्वत: सोनाक्षीनं याबद्दल सांगितलं आहे. सलमान आमच्या नात्याचा सूत्रधार असल्याची प्रतिक्रिया सोनाक्षीनं नुकतीच एका मुलाखतीत दिली. सलमान खानच्या घरी एका पार्टीत सोनाक्षी व झहीर यांची भेट झाली आणि नंतर दोघांची लव्हस्टोरी





सुरू झाली.पिंकव्हिलाला दिलेल्या मुलाखतीत सोनाक्षीला सलमान खानविषयी विचारण्यात आले. तिच्या लग्नाबद्दल सलमानला माहीत होते का? आणि त्यावर त्याची काय प्रतिक्रिया होती, असा प्रश्न सोनाक्षीला विचारण्यात आला. यावेळी सोनाक्षी म्हणाली, "सलमान खान खूप आनंदी होता. मला तो खूपच आवडतो. त्याच्यामुळेच झहीर आणि माझी भेट झाली. आमच्या लग्नाचं श्रेय त्यालाही जातं. त्यानंच आमचं नातं जुळवून आणलं का? तर तसं नाही. पण, त्याच्याकडे एका पार्टीत मी झहीरला भेटले. त्यामुळे त्याला मध्यस्थ म्हणू शकतो.

## किशन वादळी शतक हरियाणाला पराभूत करत झारखंडने पटकावले जेतेपद

# इशान किशनचे 45 चेंडूत शतक!

## झारखंडने पटकावले जेतेपद

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५-२६ चा अंतिम सामना १८ डिसेंबर रोजी झारखंड आणि हरियाणा या दोन संघात खेळला गेला. पुण्यात खेळवण्यात आलेल्या जेतेपदाच्या लढतीत झारखंडने हरियाणाचा ६९ धावांनी पराभव केला आणि सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५-२६ चे पहिले जेतेपद पटकावले. नाणेफेक गमावणाऱ्या झारखंडने प्रथम फलंदाजी करत कर्णधार इशान किशनच्या वादळी शतकाच्या जोरावर ३ बाद २६२ धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात हरियाणाचा संघ १८.३ षटकात १९३ धावा करून सर्वबाद झाला.**




प्रथम फलंदाजी करणाऱ्या झारखंड संघाची सुरुवात चांगली झाली नाही. पहिल्याच षटकात विराट सिंगच्या रूपाने पहिली विकेट् गमावली. त्यानंतर आलेल्या कुमार कुशाग्रसोबत सलामीवीर ईक्षण किशनने १७७ धावांची भागीदारी केली. कर्णधार इशान किशनने जबाबदारीने स्फोटक पारी खेळली. त्याने ४५ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. त्याने हरियाणाच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. इशान किशनने ४९ चेंडूत १०१ धावा केल्या. यामध्ये त्याने ६ चौकार आणि १० षटकार लगावले. त्यानंतर तो बाद झाला. त्याला सुमित कुमारने बाद केले. इशान नंतर कुमार कुशाग्राने देखील अर्धशतक करून बाद झाला. त्याने ३८ चेंडूत ८१ धावा केल्या. त्याने ८ चौकार आणि ५ षटकार लगावले. कुमार कुशाग्रानंतर आलेल्या अनुकुल रॉयने देखील स्फोटक खेळी करत अवघ्या २० चेंडूत नाबाद ४० धावा करून संघाला चांगल्या स्थितीत पोहचवले. त्याने ३ चौकार आणि २ षटकार लगावले. तसेच रॉबिन मिन्झ देखील ३१ धावांवर नाबाद राहिला. हरियाणाकडून सुमित कुमार, अंशुल कंबोज आणि सामंत जाखड यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. झारखंडने दिलेल्या डोंगरा इतक्या २६३ धावांचा पाठलाग करणाऱ्या हरियाणाची सुरुवात खूपच खराब राहिली. त्यांनी ३६ धावांमध्ये आपले ३ महत्वाचे फलंदाज गमावले. अर्श रंगा १७, कर्णधार अंकित कुमार ०, आशिष सिवाच ० धावा करून बाद झाले. यांच्यानंतर आलेल्या यशवर्धन दलाल आणि निशांत सिंधू यांनी ६७ धावांची भागीदारी केली. यशवर्धन दलाल २२ चेंडूत ५३ धावा करून बाद झाला तर सिंधू ३१ धावांवर माघारी परतला. त्यानंतर सामंत जाखडने ३८ धावा करत थोडा संघर्ष केला पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. पार्थ वत्स ४ धावा, सुमित कुमार ५ धावा, अंशुल कंबोज ११ धावा, इशांत भारद्वाज १७ धावा करून बाद झाले तर अमित राणा १३ धावा करून नाबाद राहिला. झारखंडकडून सुशांत मिश्रा आणि बाळ कृष्ण यांनी सर्वाधिक प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. तर विकास सिंग आणि अनुकुल रॉय यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. परिणामी झारखंडने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५-२६ चे जेतेपद पटकावले.सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५-२६ चा अंतिम सामना १८ डिसेंबर रोजी झारखंड आणि हरियाणा या दोन संघात खेळला गेला. पुण्यात खेळवण्यात आलेल्या जेतेपदाच्या लढतीत झारखंडने हरियाणाचा ६९ धावांनी पराभव केला आणि सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५-२६ चे पहिले जेतेपद पटकावले. नाणेफेक गमावणाऱ्या झारखंडने प्रथम फलंदाजी करत कर्णधार इशान किशनच्या वादळी शतकाच्या जोरावर ३ बाद २६२ धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात हरियाणाचा संघ १८.३ षटकात १९३ धावा करून सर्वबाद झाला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या झारखंड संघाची सुरुवात चांगली झाली नाही. पहिल्याच षटकात विराट सिंगच्या रूपाने पहिली विकेट् गमावली. त्यानंतर आलेल्या कुमार कुशाग्रसोबत सलामीवीर ईक्षण किशनने १७७ धावांची भागीदारी केली. कर्णधार इशान किशनने जबाबदारीने स्फोटक पारी खेळली. त्याने ४५ चेंडूत आपले शतक पूर्ण केले.

### अनुकुल रॉयची स्फोटक खेळी

त्याने हरियाणाच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. इशान किशनने ४९ चेंडूत १०१ धावा केल्या. यामध्ये त्याने ६ चौकार आणि १० षटकार लगावले. त्यानंतर तो बाद झाला. त्याला सुमित कुमारने बाद केले. इशान नंतर कुमार कुशाग्राने देखील अर्धशतक करून बाद झाला. त्याने ३८ चेंडूत ८१ धावा केल्या. त्याने ८ चौकार आणि ५ षटकार लगावले. कुमार कुशाग्रानंतर आलेल्या अनुकुल रॉयने देखील स्फोटक खेळी करत अवघ्या २० चेंडूत नाबाद ४० धावा करून संघाला चांगल्या स्थितीत पोहचवले.

## पाचव्या T20I सामन्यावर 'रद्द' चे सावट?

## शेवटचा T20I सामना नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाणार

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाच सामन्यांच्या T20I मालिकेतील चौथा सामना १७ डिसेंबर रोजी लखनऊच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर खेळवण्यात येणार होता. परंतु, दाटलेल्या धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्यामुळे सामना रद्द करण्यात आला.**




आता, सर्वांच्या नजरा पाचव्या आणि शेवटच्या T20I सामन्यावर असून हा सामना १९ डिसेंबर रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाणार आहे. ज्यामुळे मालिकेचा निकाल काय लागतो हे निश्चित होईल.लखनऊ सामना रद्द झाल्यानंतर चाहते हवामानाबद्दल अधिक चिंता व्यक्त करत आहेत. परंतु अहमदाबादमधून मात्र आता चांगली बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान खात्याच्या मते, १९ डिसेंबर रोजी अहमदाबादमधील हवामान पूर्णपणे निरभ्र राहण्याची अपेक्षा आहे. तसेच आकाश निरभ्र राहणार असून पाऊस किंवा धुक्याचा कोणताही अंदाज वर्तवण्यात आलेला नाही. दिवसाला तापमान ३० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे, तर रात्री किमान तापमान १५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. अशा परिस्थितीत, चाहते पूर्ण २० षटकांच्या सामन्याचा थरार पाहू शकतात.हवामानासह, अहमदाबादची हवेची गुणवत्ता देखील समाधानकारक आहे. सध्या, AQI १०० ते १२० दरम्यान नोंदवले गेले असून जे खेळासाठी स्वीकार्य मानले जाते. त्यामुळे, खेळाडूंना श्वसनाच्या कोणत्याही समस्येला सामोरे जावे लागणार नाही. तसेच सामना कोणत्याही व्यत्ययाशिवाय पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### भारताची मालिकेत आघाडी

टी२० मालिका सध्या महत्त्वाच्या वळणार आलेली आहे. चार सामन्यांनंतर, टीम इंडिया २-१ ने आघाडी घेतली आहे. त्यामुळे, भारतीय संघ अहमदाबादमधील अंतिम सामना जिंकून मालिका ३-१ अशी जिंकण्याच्या इराद्याने मैदानात उतरणार आहे. दरम्यान, दक्षिण आफ्रिकेचा संघ मालिका बरोबरीत आणण्याच्या उद्देशाने मैदानात उतरणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। शुक्रवार ।
दि. 19 डिसेंबर 2025

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### अपप्रवृत्तीच्या लोकांना पक्षात स्थान देऊन

# पक्ष प्रतिमा व पक्षाच्या परंपरेला गालबोट लावून देऊ नका..!

## मिशन- PCMC: वाकड मधील भाजपा पदाधिकाऱ्यांचा राहुल कलाटे यांच्या पक्षप्रवेशाला तीव्र विरोध

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाकड येथील स्थानिक नेते राहुल कलाटे व अन्य पक्षातील नेत्यांच्या भाजप पक्षप्रवेशाला तीव्र विरोध व्यक्त करण्यासाठी माजी नगरसेवक विनायक गायकवाड, भाजपचे शहर उपाध्यक्ष विशाल कलाटे, राम वाकडकर, भाजपा ओबीसी मोर्चाचे शहराध्यक्ष चेतन भुजबळ, महिला मोर्चाच्या प्रदेश पदाधिकारी भारती विनोदे, राहुल काटे, नवनाथ ढवळे व इतर पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत प्रभाग क्रमांक २५ मधून पक्षाच्या धोरणाविरोधात बंडखोरी करण्याच्या भूमिकेत ते असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.**



या परिषदेत ते पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना आपली भूमिका मांडून कलाटे यांच्या पक्ष प्रवेशाला विरोध करणार असल्याचे भाजप पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. गेल्या अनेक वर्षापासून पक्षाचे काम करणाऱ्या निष्ठावंतांना डावलून आयाराम ग्यारामाना प्राथमिकता देणं अयोग्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राहुल कलाटे यांचा इतिहास व राजकिय पार्श्वभूमी पाहता त्यांनी आपल्या सोयीनुसार अनेक पक्षांची वारी केली असून तेआतापर्यंत कोणाशीही एकनिष्ठ राहिले नाहीत. स्वार्थासाठी मलीन प्रतिमा असलेल्या या नेत्याला गत निवडणुकीत स्वतःचे डिपॉझिट देखील वाचवता आले नाही. स्थायी समिती सभेत या गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीने एका महापालिकेच्या अधिकाऱ्याला मारहाण केली आहे. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पदाधिकाऱ्याला देखील यापूर्वी मारहाण केलेली आहे.

यावेळी भाजपचे शहर उपाध्यक्ष राम वाकडकर म्हणाले, “वाकड भागातील स्थानिक कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा राहुल कलाटे यांच्या पक्षप्रवेशाला पूर्णपणे विरोध आहे. त्यांच्या प्रवेशामुळे पक्षाच्या अंतर्गत एकजुटीला व प्रतिमेला धक्का बसू शकतो.

**स्थानिक नेत्यांच्या मताचा विचार करावा...**

आगामी महापालिका निवडणुकीत पक्षाच्या यशावर परिणाम होऊ शकतो. आम्ही पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना या परिषदेतून आमची भूमिका स्पष्टपणे सांगणार आहोत. जर आमच्या भूमिकेचा आदर झाला नाही, तर आम्ही मोदीजी आणि फडणवीस साहेबांच्या नेतृत्वाखालील पक्षाच्या मूल्यांना जपतच बंडखोरीचा मार्ग अवलंबू शकतो. हे पक्षाच्या हितासाठीच करणार आहोत.”

या पत्रकार परिषदेत भाजपचे इतर पदाधिकारी देखील सहभागी झाले होते असून, ते वाकड भागातील स्थानिक समस्या, पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या भावना आणि कलाटे यांच्या प्रवेशाच्या संभाव्य परिणामांवर भूमिका मांडत पक्षाच्या एकतेसाठी आणि निवडणुकीच्या यशासाठी हे पाऊल आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. भाजपचे पदाधिकारी या परिषदेतून पक्षाच्या वरिष्ठांना आवाहन करत म्हणाले की, स्थानिक नेत्यांच्या मताचा विचार करून निर्णय घ्यावा, जेणेकरून पक्ष संघटना आणि शहरात पक्षाची ताकद मजबूत राहील आणि महापालिका निवडणुकीत सहज विजय मिळवता येईल.

# चाकण–तळेगाव महामार्गावर भीषण अपघात

## टेम्पो–रिक्षाची धडक; दोघांचा मृत्यू, दोघे गंभीर जखमी

। चाकण । प्रतिनिधी : महाईन्यूज

**औद्योगिक वसाहतीत बेकायदा प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षाचा अपघात झाला. वाहन ओलांडून पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असताना समोरून येणाऱ्या वाहनाची धडक रिक्षाला झाली. त्यामुळे रिक्षा पलटी होऊन दोन प्रवासी ठार झाले तर रिक्षा चालका सह दोन जण गंभीर जखमी झाले आहे.**



याबाबत अधिक माहिती अशी की, चाकण–तळेगाव महामार्गावर महाळुंगे गावच्या हद्दीत शुक्रवारी (दि.१८) सकाळी भीषण अपघात झाला. प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षाला समोरून येणाऱ्या टेम्पोची जोरदार धडक बसल्याने रिक्षाचा पूर्णपणे चक्काचूर झाली. या अपघातात तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत, अशी माहिती महाळुंगे पोलिसांनी दिली. रामसुंदर राम खिलावन साखेद (वय.४७ वर्षे, सध्या रा. म्हाळुंगे, ता. खेड, जि. पुणे; मूळ रा. ओडकी, जि. रिवा, मध्य प्रदेश) पिंटू राजन बिहारा (वय. २५ वर्षे, सध्या रा. महाळुंगे, मूळ रा. पट्टा सुंदरपूर, जि.पुरी, ओडिशा) असे अपघात ठार झालेल्यांची नावे आहेत, तर रिक्षा चालक रोहिदास सीताराम आडे (वय.३६ वर्षे,रा. खराबवाडी) आणि सागर मोहन मॉन्टी (वय.२६ वर्षे,रा. खराबवाडी) हे जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार चाकणकडून औद्योगिक वसाहतीच्या महाळुंगे गावच्या दिशेने प्रवासी घेऊन जाणाऱ्या रिक्षाला समोरून येणाऱ्या टेम्पोची जोरदार धडक बसल्याने अपघाताची तीव्रता वाढली. अपघात इतका भीषण होता की, रिक्षाचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. वाहन ओलांडून पुढे जाण्याच्या प्रयत्न करीत असताना अपघात झाला अशी माहिती अपघात पाहणाऱ्या व्यक्तीने सांगितले. दरम्यान, चाकण परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध प्रवासी वाहतूक सुरू असतानाही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. रिक्षांना केवळ तीन प्रवाशांची परवानगी असताना दहा–पंधरा प्रवासी दाटीवाटीने कोंबून वाहतूक केली जात असल्याचे चित्र वारंवार दिसून येते. अशा बेजबाबदार वाहतुकीमुळेच अपघातांना आमंत्रण मिळत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. खराब व कमी रुंदीचे रस्ते तसेच पीएमपीएल बसेस ची अपुरी संख्याही देखील अपघाताची करणे आहेत. औद्योगिक वसाहतीत रोजंदारीने जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी यामुळे या मार्गावर सातत्याने अपघात होत आहेत.

## चऱ्होली प्रभाग 3 मधून 'एक गाव, एक उमेदवार'चा ठाम निर्धार

# राखीव जागेसाठी चऱ्होली ग्रामस्थांचा एकमताचा निर्णय

## विकासात्मक विचारधारेमुळे प्रचारात सकारात्मक वातावरण

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चऱ्होली येथील प्रभाग क्रमांक ३ मधील (अ) अनुसूचित जाती महिला राखीव जागेसाठी ग्रामस्थांनी 'एक गाव, एक उमेदवार' या तत्त्वावर एकमताने निर्णय घेतला आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मतभेद बाजूला ठेवत एकसंघपणे पुढे जाण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.**



या निर्णयामध्ये गावातील ज्येष्ठ नागरिक, व्यापारी वर्ग, सामाजिक कार्यकर्ते, महिला बचत गट तसेच तरुण वर्ग यांचा सक्रिय सहभाग होता. एकमताने घेतलेल्या या निर्णयामुळे प्रभागात ऐक्याचे आणि सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून विकासाच्या दृष्टीने एकसंघ नेतृत्वाला पाठिंबा देण्याची भूमिका ग्रामस्थांनी स्पष्ट केली आहे.

प्रचारादरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधताना विकासकामे, मूलभूत सुविधा, महिला सक्षमीकरण, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि सामाजिक सलोखा या मुद्द्यांवर भर दिला जात आहे. या विकासाभिमुख भूमिकेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून प्रभागात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः महिला वर्गाने मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवत महिलांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणाऱ्या नेतृत्वाला पाठिंबा दर्शविला आहे. तसेच व्यापारी वर्गानेही पारदर्शक व विकासकेंद्रित कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त केला आहे.

### नागरिकांकडून विकासाची ग्वाही..

सध्या प्रचारात 'एक गाव, एक उमेदवार' या संकल्पनेमुळे मतांचे विभाजन टळणार असल्याचा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत. ग्रामस्थांनी एकमताने घेतलेल्या या निर्णयामुळे आगामी निवडणुकीत एकसंघ मतदान होऊन प्रभागाच्या विकासासाठी सक्षम नेतृत्व मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## थिंकटेक इंडिया स्पर्धेत डी.वाय. पाटील विद्यापीठाची बाजी

# सीमएड्यूतील 14 विद्यार्थ्यांना नामांकित कंपनीत संधी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: डॉ. सुशांत पाटील ग्रुपसाठी अभिमानाचा क्षण ठरला असून सीमएड्यू डी.वाय. पाटील विद्यापीठ आंबी आणि सीमएड्यू अजींक्य डी वाय पाटील विद्यापीठ पुणे येथील १४ विद्यार्थ्यांची थिंकटेक इंडिया या नामांकित कंपनीत यशस्वी प्लेसमेंट झाली आहे.**

यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांमध्ये आदित्य सुर्वे, ईश्वरी डुंबरे, निखिल मिश्रा, रितेश मांडे, तेजश्री वाघ, अंकित लाल, जिया कुमार, निलाक्षी काळे, रुद्र धोणे, गोपाळसिंग तनवार, मिथाली सूर्यवंशी, प्रथमेश धागे, सुमित राठी आणि सौरव नायर यांचा समावेश आहे. सर्व विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम आणि सातत्याने आत्मविश्वास कायम ठेवत ही यशस्वी वाटचाल गाठली आहे.

बी.टेक, आयटीडीएस, सीटीआयएस तसेच एमसीए (एआय) या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी प्रभावी तांत्रिक कौशल्ये, विश्लेषण क्षमता आणि उद्योगपातळीवरील प्रकल्पांच्या अनुभवाच्या बळावर स्वतःची निवड निश्चित केली. या मुलाखतींमध्ये विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण विचार, समस्या सोडवण्याची क्षमता आणि आधुनिक तंत्रज्ञानाची समज यांची प्रभावी नोंद केली. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशातील प्रशिक्षण आणि प्लेसमेंट विभागाचे योगदान लक्षणीय राहिले. उद्योग क्षेत्रातील मागणीनुसार




विद्यार्थ्यांची कौशल्ये विकसित करण्यासाठी विविध प्रशिक्षण सत्रे, तांत्रिक कार्यशाळा, मॉक इंटरव्ह्यू, समस्यांवरील प्रॅक्टिकल सोल्युशन्स यांचे आयोजन करण्यात आले. सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि उद्योगमानक कौशल्यविकास उपक्रमांचा हा सकारात्मक परिणाम असल्याचे कॉलेज प्रशासनाने सांगितले.

या यशामागे संस्थेचे मार्गदर्शक डॉ. सुशांत पाटील व ॲड. अनुजा पाटील यांची दूरदृष्टी आणि नावीन्यपूर्ण नेतृत्व महत्त्वाचे ठरल्याचे मान्यतेने व्यक्त करण्यात आले. विद्यार्थी केंद्रित शिक्षण, प्रगत प्रयोगशाळा, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम, आधुनिक सुविधा आणि गुणवत्ता प्रणाली यांनी शिक्षणाचा दर्जा उंचावला आहे.

उद्योग क्षेत्रातील सहकार्य, संशोधन प्रकल्प आणि कौशल्य विकास यांवर डॉ. सुशांत पाटील यांनी नेहमीच भर दिला आहे. त्यामुळे शिक्षणासोबत रोजगारसंधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश प्रत्यक्षात साकार झाला असल्याचे उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी म्हटले.

या निवडीमुळे विद्यार्थ्यांना कारकीर्द घडवण्यासाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध झाले असून उद्योग–शैक्षणिक सहकार्याचा मार्ग अधिक भक्कम झाला आहे. थिंकटेक इंडियासारख्या नामांकित कंपनीत निवड झाल्याने नवनव्या संधी, प्रकल्प अनुभव आणि करिअर वाढीचा मार्ग खुला होणार आहे. डॉ. सुशांत पाटील ग्रुपच्या वतीने सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले असून भविष्यात आणखी विद्यार्थ्यांना रोजगार संधी निर्माण करण्यासाठी संस्थेमार्फत प्रभावी उपक्रम राबविले जाणार असल्याचे कळविण्यात आले.

प्लेसमेंटची ही कामगिरी सीमएड्यूतील शिक्षण पद्धती, तांत्रिक प्रशिक्षण व कौशल्य विकासातील दूरदृष्टी अधोरेखित करणारी ठरली आहे. विद्यार्थ्यांनी दाखविलेला उत्साह, आत्मविश्वास आणि प्रगतीचा प्रवास अन्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

## पुर्णानगर परिसरात प्रभाग क्रमांक 11 मध्ये

# निशा दिनेश यादव यांचा घरोघरी "जनसंवाद"!

## महिलांकडून पारंपरिक पद्धतीने औक्षण करत उस्फुर्त स्वागत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: पुर्णानगर परिसरात प्रभाग क्रमांक ११ मधील इंद्रायणी महिला प्रतिष्ठान अध्यक्षा निशा दिनेश यादव यांनी नागरिकांच्या सदिच्छा भेटी घेत परिचय पत्राचे वितरण केले. घरोघरी जाऊन त्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधला. या संवादातून परिसरातील नागरिकांच्या अपेक्षा, समस्या आणि विविध प्रश्नांची माहिती त्यांना जवळून समजून घेता आली.**



भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. महेशदादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली शहर विकासाचा नवा अध्याय लिहीत आहे. या विकासाच्या कार्यात आपणही सहभागी होऊन आमदारांचे हात बळकट करायचे आहेत. असे मनोगत निशा यादव यांनी व्यक्त केले. या भेटीदरम्यान परिसरातील महिलांनी पारंपरिक पद्धतीने औक्षण करून त्यांचे स्वागत केले. नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा विश्वास पाहून निशा यादव यांनी समाधान व्यक्त केले. नागरिकांचा हा स्नेह आणि पाठिंबा आपल्यासाठी प्रेरणादायी असून या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही, असे त्यांनी यावेळी सांगितले.

पुर्णानगर परिसरातील नागरिकांमध्ये या भेटीमुळे सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून जनतेशी थेट संपर्क साधण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याची प्रतिक्रिया अनेक नागरिकांनी व्यक्त केली.

> “ नागरिकांचा विश्वास आणि स्नेह हीच माझ्या कामाची खरी ताकद आहे. त्यांच्या अपेक्षा आणि समस्या सोडवण्यासाठी मी सदैव प्रामाणिकपणे प्रयत्न करेन आणि या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही.
>
> **-निशा दिनेश यादव,** अध्यक्षा, इंद्रायणी महिला प्रतिष्ठान

---

## दररोज २५० किलो ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मितीची प्रक्रिया

## एरोबिक पद्धतीने सेंद्रिय खतनिर्मितीची महापालिकेची प्रभावी उपाययोजना

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने यशवंतराव चव्हाण गुलाब पुष्प वाटिका येथे उभारण्यात आलेल्या सामुदायिक कंपोस्टिंग केंद्रास महापालिकेचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी भेट देत पाहणी केली. यावेळी त्यांनी शहरात विकेंद्रित कचरा व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत.**



पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल व सहाय्यक आयुक्त अमित पंडित यांच्या अधिपत्याखाली शहरात स्वच्छतेविषयक विविध अभिनव व पर्यावरणपूरक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांचा भाग म्हणून पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने गुलाब पुष्प वाटिका येथे सामुदायिक कंपोस्टिंग केंद्र स्वर्णलता मदरसन ट्रस्ट आणि इंडियन पॉल्यूशन कंट्रोल असोसिएशन (आय.पी.सी.ए.) यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आले आहे. या केंद्रामार्फत दररोज सुमारे २५० किलोपर्यंत ओल्या कचऱ्यावर एरोबिक कंपोस्टिंग तंत्रज्ञानाचा वापर करून सेंद्रिय खतनिर्मिती करण्यात येणार असून, यामुळे कचऱ्याचे स्रोतस्थळीच व्यवस्थापन होण्यास मदत मिळणार आहे. या केंद्राला उपायुक्त डॉ. ठेंगल यांनी भेट देत पाहणी केली. उपायुक्त डॉ. ठेंगल म्हणाले की, शहरांमध्ये वाढत चाललेल्या कचऱ्याच्या समस्येवर मात करण्यासाठी सामुदायिक पातळीवरील कंपोस्टिंग ही प्रभावी व शाश्वत उपाययोजना आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने अशा उपक्रमांचा अधिकाधिक अवलंब करणे आवश्यक असून, नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. तसेच शहरातील गृहनिर्माण संस्था व शैक्षणिक संस्थांनी कचरा विलगीकरण उपक्रम प्रभावीपणे राबवून जनजागृती वाढवावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी कलासाम्राज्य आर्ट ग्रुप यांच्या वतीने कचरा व्यवस्थापनावर आधारित प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले. त्यानंतर आय.पी.सी.ए.चे वरिष्ठ प्रकल्प कार्यकारी अधिकारी सुजित गेडाम यांनी एरोबिक कंपोस्टिंग प्रक्रियेची माहिती तसेच कचरा विलगीकरणाचे महत्त्व उपस्थितांना सविस्तरपणे समजावून सांगितले.

### यांची प्रामुख्याने उपस्थिती...

याप्रसंगी महापालिका प्रशासन अधिकारी सुनीता वाईकर, सहाय्यक आरोग्य अधिकारी तानाजी दाते, सुधीर वाघमारे, महेश आढाव, राजेश भाट, अंकुश झिटे, मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे, आरोग्य निरीक्षक सतीश इंगेवाड, राहुल जेठीथोर, क्षितिज रोकडे, राजेंद्र उजिनवाल, आय.पी.सी.ए.चे विभागीय व्यवस्थापक झिशान खान, सोपान इंगोले, आशिष कुंभलकर, सुजित गेडाम, मनीषा वुडीपी आदी उपस्थित होते.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046